नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१५/२०२२ (कोकण रेल्वे कॉर्पोरेशन – वादी वि. श्री.महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ –प्रतिवादी ) मधील नि. ४३ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले . प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द दावा 'विना कैफियत' चालविणेबाबतचा झालेला आदेश रद्द होवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी यासाठी दाखल केला आहे . प्रतिवादी यांचे म्हणणे की , प्रतिवादी हे दाव्याचे कामी हजर होवून त्यांनी नि . ५ वर आपले म्हणणे दाखल केले आहे. सदर दाव्यामध्ये नि.५ व अन्य निशाणांवर चौकशी चालू असल्याने नजुरचुकीने कैफियत देण्याची राहुन गेली आहे. प्रतिवादींची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे . सबब त्यामुळे प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द दावा 'विना कैफियत' चालविणेबाबतचा आदेश रद्द होवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. वादीने प्रस्तुतच्या अर्जावरच नि . ४६ कडे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. वादी यांचे म्हणणे की , प्रतिवादी हे दिनांक १४/२/२०२२ रोजी दाव्याचे कामी हजर झाले असून त्यांनी नि .१३ कडे हा दावा चालविणेचा मे. न्यायालयाला अधिकारक्षेत्र व अधिकार नसलेबाबत अर्ज दिला आहे. तसेच ताकीद अर्जावर म्हणणे दाखल करुन पुराव्याकामी कागदपत्रे दाखल केली आहेत. त्यामुळे अर्जात दिलेले कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादी यांनी नि. १३ कडील अर्जानुसार या मे. न्यायालयाला दावा चालविण्याचा अधिकार नाही असे गृहित धरुन जाणुन बुजुन कैफियत दाखल केलेली नाही. तसेच अर्जात विलंबाबत कोणतेही कारण नमुद नाही. तरी अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे. .

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांना उचितरित्या दाव्याचे समन्स बजावणी होवून ते दाव्याचे कामी हजर झाले आहेत . दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०८ , नियम १ अन्वये प्रतिवादी यांना उचित संधी देवून देखील त्यांनी विहित मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज विहित मुदतीनंतर दाखल केलेला आहे . वादीने

प्रस्तुतचा दावा, प्रतिवादी यांचेविरुध्द ठराव, कायम ताकीद व आज्ञार्थी ताकीदीसाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादी यांना दाव्यामध्ये आपली कैफियत दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्याची संधी दिल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयाला मदतच होणार आहे. प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन घेतल्यास वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही . परंतु प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला असल्याने त्यांचेवर उचित खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल . करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## – आदेश –

१. प्रतिवादी यांनी वादीला रक्कम रुपये २००/–(रुपये दोनशे मात्र) इतका खर्च देणेचे अटीवर प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल.

सही/–

(अ. जो. बाचुलकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुडाळ.

ठिकाण : कुडाळ.
दिनांक – १६/०१/२०२४